# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०२.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १५ केसेसमध्ये १५ ईसमावर कारवाई करून एकुण ३०,०४१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून एकुण २,८७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३२९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,०६,१००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) वाडी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १७.०४.२०२६ चे ११.१५ वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी कुणाल प्रकाश जैस्वाल, वय २७ वर्षे, रा. महाकाली नगर, मानेवाडा, नागपूर यांनी त्यांची होंडा ॲक्टीवा मोपेड गाडी क्र. एम.एच. ४९ ए.एन. २९५० किंमती ५०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे वाडी हद्दीत वाडी टि—पॉईंट, ए वन बार ॲण्ड रेस्टॉरेंट चे खाली लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची ॲक्टीवा गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस ठाणे वाडी येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे आदर्श उर्फ अमोल सदानंद मेश्राम, वय ४२ वर्षे, रा. आठवा मैल, दवलामेटी, वाडी, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे वाडी हद्दीतुन स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम.एच. ३६ ए.सि. ५४७० किंमती ७०,०००/—रू. ची चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन ०२ दुचाकी वाहने एकुण किंमती १,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतीषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय.डि.सी. विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राजेश

तटकरे, पोउपनि. अमित बंडगर, पोहवा. रोशन फुकट, राहुल बोटरे, सोमेश्वर वर्धे, दुर्गादास माकडे, पोअं. विनोद कुंभलकर, स्वप्नील कारंडे व अश्वीन चौधरी यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०५.२०२६ चे ०५.२० वा. ते ०५.५१ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, शैलपुत्री अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०१, शिवगौरी चौक, शंभुनगर, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी यांची मुलगी कु. आस्था संजय सिरीया, वय १९ वर्षे ही सकाळी आपले राहते घराला कुलूप लावून मॉर्निंग वॉककरीता गेली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ३,०००/—रू., तसेच सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,२६,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी सौ. किरण संजय सिरीया, वय ४३ वषे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. महेंद्र चोपडे ९८२३१९७४६८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर :— फसवणुक करणारी महिला आरोपी अटक.</u>**

पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, प्लॉट नं. २७, गणपती नगर, स्वामीनगर नेताजी को ऑपरेटीव्ह सोसायटी, गोरेवाडा, झिंगाबाई टाकळी, नागपुर येथे राहणा—या फिर्यादी सौ. सुषमा इंदर शाहू वय ४७ वर्ष यांच्या परिचीत महिला आरोपी क्र. १) सौ. गिता सुनिल धामणे वय ४२ वर्ष रा. प्लॉट क्र. २१, गणपती नगर,महालक्ष्मी लॉनजवळ, मानकापूर नागपूर २) कविता प्रल्हाद भेरम वय ३५ वर्ष रा. गणपती नगर, स्वामी नगर, महाराणा—२ जवळ, झिंगाबाई टाकळी, नागपुर यांनी फिर्यादी यांना 'ठराविक रक्कम १२ महिन्यांपर्यंत जमा केल्यास महिन्याला तीन टक्के व्याजरुपात परतफेड केले जाईल' असे सांगून आर्थिक लाभाचे खोटे प्रलोभन दिले. दिनांक १३.१२.२०२३ ते दिनांक ११.१०.२०२५ चे दरम्यान आरोपीनी संगणमत करून, फिर्यादी तसेच त्यांचे वस्तीतील इतर महिला—पुरुषांकडून दर महिन्याला ठराविक रक्कम घेतली व त्याची पोचपावती म्हणून महिला बचत फंड नावाने तयार केलेल्या खोटया कार्डवर रक्कमेची नोंद करुन दिली. आरोपींनी फिर्यादी व त्यांचे वस्तीतील इतर महिला—पुरुषांकडून हफ्ते स्वरुपात एकूण १०,५०,०००/— रुपये रोख स्विकारुन मुदत संपल्यावरही कोणलाही कोणताही परतावा वा लाभ दिला नाही तसेच गुंतवणूकदार यांनी रक्कम परत मागीतली असता, दिली नाही. आरोपींनी फिर्यादी व ईतर गुंतवणुकदारांचा अन्यायाने विश्वासघात करून त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून दिनांक ०१.०५.२६ रोजी पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि जावेद तडवी ९७६४७७६४०९ यांनी दोन्ही महीला आरोपींविरूध्द कलम

३१८(४),३(५) भा.न्या.सं., सहकलम ३,४ एम.पी.आय.डी. ॲक्ट— १९९९ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी क्र. १) सौ. गिता सुनिल धामणे वय ४२ वर्ष हीला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक २५.०४.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, आस्था निवारा, घाटरोड येथे वास्तव्यास असणारे एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ६५ वर्षे यांची प्रकृति खराब झाल्याने त्यांना आस्था निवाराचे कर्मचारी अनंत नागोसे यांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. दिनांक ०१.०५.२०२६ रोजी उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मपोउपनि. निलम घोडके यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक ०१.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे मामा नामे सदाशिव नामदेव मडावी, वय ४० वर्षे, रा. किन्ही, पो. व्याहाळ, तह. हिंगणा, जि. नागपुर हे पो. ठाणे हिंगणा हद्दीत किन्ही गावालगत असलेल्या नाल्याजवळ मासोळी पकडण्याकरीता गेले असता, त्यांना ईलेक्ट्रीकचा करंट लागल्याने, त्यांचे संतुलन बिघडुन ते नाल्याचे पाण्यात पडुन बेशुध्द झाले. त्यांना पाण्याबाहेर काढुन उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी आकाश रूपराव उईके, वय ३३ वर्षे, रा. किन्ही, पो. व्याहाळ, तह. हिंगणा, जि. नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. सचिन इंगळे ७०६६५२५२२३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** गजानन सखाराम कटकमवार, वय ७७ वर्षे, रा. गुरूकुंज नगर प्लॉट नं. १४०, चिखली रोड, मानेवाडा, नागपूर हे दिनांक २२.०४.२०२६ चे १७.३० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील उदय नगर चौकातील सलूनचे दुकानातून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे—पांढरे, अंगात— ग्रे रंगाची टी—शर्ट व निळ्या रंगाचा नाईट पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी बोलतात.



गजानन

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**